-: परिशिष्ट "ब" :-

डॉ. माने मेडिकल फौंडेशनअँण्ड रिसर्च सेंटर, मु.पो. धानोरे, ता.राहुरी जि. अहमदनगर

ज्ञापन (मेमोरँडम ऑफ असोसिएशन)

1. संस्थेचे नांव : डॉ. माने मेडिकल फौंडेशन अँण्ड रिसर्च सेंटर मु.पो. धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर

2. कार्यालयाचा पत्ता : मु.पो. धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर

3. संस्थेचे उद्देश :

1. गरीब व गरजू रुग्णासाठी अत्याधुनिक रुग्णालय सुरु करणे, ते चालविणे व त्यामधून सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया इ. वैद्यकीय सोयी सुविधा पुरविणे. अशाप्रकारच्या हॉस्पीटलमध्ये गरीब व निराधार रुग्णांसाठी काही खाटा आरक्षीत ठेवून त्यांना मोफत वैद्यकीय सेवा पुरवणे व औषधे उपलब्ध करुन देणे.

2. ग्रामिण भागामध्ये वैद्यकीय महाविद्यालय व नर्सिंग महाविद्यालय सुरु करणे.

3. असाध्य आजार व शस्त्रक्रिया यांसाठी खर्च करु न शकणा-या गरजू रुग्णांसाठी शासकीय तसेच खाजगी व विविध दानशूर संस्थांकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांचे पुर्ततेसाठी मार्गदर्शन करणे

4. ग्रामिण व शहरी भागामधील विविध प्रकारच्या आजारांबाबत व ते आजार न होण्यासाठी घ्यावयाची काळजी व तपासणी यासाठी जनजागृती करणे शिबीरांचे आयोजन करणे.

5. विविध प्रकारच्या आजारांवर उपचार करणेसाठी मोफत वैद्यकीय शिबीरांचे आयोजन करणे.

6. दुर्गम भागामध्ये वैद्यकीय सेवा पुरविणे, माता बाल संगोपणाच्या सर्व प्रकारच्या सुविधा पुरविणे.

7. वैद्यकीय क्षेत्रातील सर्व प्रकारच्या ट्रेनिंग इंस्टिटयूट,महाविद्यालय सुरु करणे उदा. नर्सिंग स्कूल इ.

8. लहान मुले, महिला व पुरुष यांचेसाठी विविध आजारांवर संशोधन करणे व त्याविषयीचे उच्च शिक्षणांची सोय उपलब्ध करुन देणे.

9. ग्रामिण व शहरी जनतेच्या आरोग्या विषयी जनजागृतीसाठी विविध व्याख्याने व मोफत आरोग्य तपासणी शिबीरे घेणे.

10. महिला व बाल आरोग्याबाबत असणा-या विविध शासकीय योजनाची माहिती होण्यासाठी जनजागृती शिबीरांचे आयोजन करणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ.स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

11. वैद्यकीय व्यवसायीकांच्या कार्यशाळांचे आयोजन करणे.
12. ना नफा ना तोटा या तत्वावर रुग्ण वाहिकांची सुविधा उपलब्ध करणे.

13. वैद्यकीय क्षेत्रामध्ये क्रांती होण्यासाठी नव नविन संशोधन करण्यासाठी प्रयत्न करणे.

14. रोगनिदान, रक्तदान शिबीरे, नेत्रचिकित्सा शिबीरे, कुटूंबकल्याण शिबीरे, रक्तगट तपासणी शिबीरे, चर्चासत्र आयोजित करणे.

15. सर्वप्रकारे वैद्यकिय सेवा व शिक्षण उपलब्ध करुन देणे त्यासाठी वैद्यकिय महाविद्यालय सुरु करणे, ग्रामिण रुग्णालय व दवाखांना, रुग्णवाहीका इत्यादी सोयी उपलब्ध करुन देणे. अधुनिक तंत्रज्ञान व सोयी उपलब्ध करुन देणे. तसेच एम.बी.बी.एस. बी.ए. एम.एस., बी.एच. एम.एस. महाविद्यालय व डी.एम.एल.टी. प्रशिक्षण कोर्सेस सुरु करणे.

16. गरीब व गरजू रुग्णांसाठी मोफत किंवा सवलतीच्या दरात वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देणे. तसेच त्यांचे मोफत औषधोपचाराची व्यवस्था करणे.तसेच गरीब व गरजू रुग्णांसाठी रुग्णवाहीका सुरु करणे.

17. कुटूंबकल्याण, नसबंदी, ग्रामिण आरोग्य विकास प्रकल्प, एडस् निर्मुलन कार्य, पोलीओ निर्मुलन कार्य यासारखे कार्यक्रम राबविणे.

18. अंगणवाडी, बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालय मराठी, इंग्रजी . तसेच कन्याशाळा सुरु करणे. तसेच बालवाडी, अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र सुरु करणे.

19. तांत्रिक शिक्षण, डी.एड., बी.एड., बी.पी.एड. शिक्षणाचे कोर्सेस सुरु करणे.

20. इलेक्ट्रॉनिक अभ्यासक्रम, अभियांत्रिकी आणि कला, शास्त्र अभ्यासक्रम व गृहशास्त्र अभ्यासक्रमाचे वर्ग सुरु करणे.

21 आश्रमशाळा, वसतिगृह, मूकबधिर विद्यालय, अंध-अपंगशाळा, रात्र प्रशाला, सैनिकीशाळा सुरु करणे.

22 सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय सुरु करणे. लहान मुलांनसाठी संस्कार वर्ग चालविणे, तसेच प्रोढ साक्षरता वर्ग चालविणे.

23 अनाथ, गरीब व गरजू होतकरु मुलांना/विद्यार्थ्यांना मोफत वहया, पुस्तके व शैक्षणिक मदत करणे, शिष्यवृत्ती देणे व संस्थेच्या नावाने शैक्षणिक सुविधा व सवलती उपलब्ध करुन देणे.

24 गरजु लोकांच्या विकासासाठी शैक्षणिक, सामाजिक उपक्रम व विविध शासकीय, निमशासकीय योजना राबविणे.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| डॉ.स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

25. पर्यावरण विषयक, प्रदुषणविरोधी जनजागृती करणे, रिसर्च डेव्हलपमेंट सेंटर काढून वनौषधींचा शोध लावणे व विविध वस्तुंची निर्मीती करणे, प्रदर्शने भरविणे.

26 अंधश्रध्दा निर्मुलन व वैज्ञानिक दृष्टीचा प्रचार प्रसार करणे. तसेच स्पर्धा परिक्षा व कृषि मार्गदर्शन वर्ग सुरु करणे.

27 हस्तकला, शिवणकाम, विणकाम, भरतकाम, चित्रकला इ. शिक्षण देणे व त्यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरु करणे व त्यांचे व्यवस्थापन पाहाणे.

28 व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, तंत्रशिक्षण, वैद्यकिय शिक्षण व प्रशिक्षण, शारिरीक शिक्षण व प्रशिक्षण, सामाजिक कार्य शिक्षण व प्रशिक्षण यासारख्या संस्था चालविणे.

29 औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण देणे उदा. वेगवेगळे पदवी व पदवीका कोर्सेस त्याचप्रमाणे कुशल व अकुशल कामगारांसाठी वेगवेगळी प्रशिक्षण केंद्र चालविणे, तसेच टंकलेखन, लघुलेखन व संगणक प्रशिक्षण देणे त्याचे विविध कोर्सेस सुरु करणे त्यासाठी वेगळा संगणक विभाग सुरु करणे. त्याचप्रमाणे व्यापारी व शेतकरी यांना जागतिक बाजार पेठेची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी संगणक पार्क उभारणे व चालविणे.

30 निसर्गाबाबत लोकांना जागृत करणे, तसे झाडे लावा, झाडे जगवा याचा प्रचार व प्रसार करणे.

31 विविध क्षेत्रातील गुणवंत, संशोधक, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते इत्यादींना पारितोषीके, शिष्यवृत्त्या,मानधन, आर्थिक व इतर प्रकारची मदत देणे.

32 राष्ट्रीय सन साजरे करणे, राष्ट्रीय पुरुषांच्या जयंती, पुन्यतिथी साजरी करणे, विविध सन, उत्सव साजरे करणे.

33 कृषी क्षेत्रात अधुनिकीकरण, जलसंपत्ती नियोजन या उदिष्टांच्या पुर्ततेसाठी कृषीशाळा, कृषीविज्ञान संस्था स्थापन करुन शेतक-यांना मार्गदर्शन करणे.

34 ग्रामस्वच्छता अभियान राबविणे. तसेच आदर्श गाव प्रकल्प योजना राबविणे.लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देणे.

35 देशात राष्ट्रीय एकात्मता व अखंडता व धर्मनिरपेक्षता, बधुभाव व विज्ञान निष्ठा जोपासणा-या कार्यक्रमांचे आयोजन करणे त्यासाठी मेळावे, परिषदा, चर्चासत्रे आयोजीत करणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ. स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

36 पक्षी व पशु संवर्धनाच्या दृष्टीने समाजात जनजागृती करणे. पशुसाठी पशुवैद्यकिय दवाखाना सुरु करणे व चालविणे. तसेच गोपालन व गोरक्षनाचा प्रचार व प्रसार करणे. गोरपालन व गोरक्षनाचे काम करणा-या संस्थांना देणग्या देणे.

37 समाजात सामुदायीक विवाह घडवून आणणे व सामुदायिक विवाहाचे आयोजन करुन ते पार पाडणे.

38. भूकंप, पुर, अतिवृष्टी अशा नैसर्गिक अपत्तित सापडलेल्या आपद्ग्रस्तांना व संकटग्रस्तांना सर्वतोपरी मदत करणे.

39. सामाजिक प्रश्नांसाठी शासनाकडे पाठपुरावा करणे, तसेच विकासासाठी शासनाकडे तसेच स्थानिक प्रशासनाकडे पाठपुरावा करणे. तसेच सामाजिक प्रश्नासाठी अंदोलन करणे त्याचा पाठपुरावा करणे.

40. विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणा-यांसाठी संस्थेच्या नावाने पुरस्कार सुरु करणे.

41 तसेच जागतील तापमान वाढीचे गांभीर्य समाजास समजावून सांगणे त्यासंबंधी परिसंवादाचे आयोजन करणे, तापमान वाढ कशापध्दतीने कामी होईल त्याबाबत संशोधन करणे, त्यासाठी प्रचार व प्रसार करणे.

वरील उद्देशापैकी जे उद्देश राबविण्यासाठी शासनाची परवानगी आवश्यक असेल त्याकरिता शासनाची पूर्वपरवानगी घेवून व शासकीय नियमाप्रमाणे फी आकारुन ते उद्देश तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येतील.

4. डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, मु.पो. धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर या संस्थेचे नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे, अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नांवे, पत्ते, वय, व्यवसाय, हुद्दा व राष्ट्रीयत्व पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| डॉ. स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

| अ.न | सभासदांचे नाव | पत्ता | पद | व्यवसाय | वय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | डॉ.स्वप्नील माधवराव माने | मु.धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर | अध्यक्ष | वै.व्यवसाय | 30 | भारतीय |
| 2. | डॉ. प्रशांत माधवराव माने | मु.धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर | उपाध्यक्ष | वै.व्यवसाय | 28 | --"-- |
| 3. | श्री.गणेश नानासाहेब बुचुडे. | मु.पो. ता.राहुरी, जि. अहमदनगर | सचिव | नोकरी | 30 | --"-- |
| 4. | श्री.संजय रावसाहेब थोरात | मु.पो. ता.राहुरी, जि. अहमदनगर | सहसचिव | नोकरी | 30 | ---"-- |
| 5. | श्री.योगेश नानासाहेब बुचुडे | मु.पो. ता.राहुरी, जि. अहमदनगर | खजिनदार | शिक्षण | 22 | --"-- |
| 6. | श्री.माधवराव विठ्ठलराव माने | मु.धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर | सदस्य | शेती | 61 | --"-- |
| 7. | श्री.विजय रावसाहेब थोरात | मु.पो. ता.राहुरी, जि. अहमदनगर | सदस्य | नोकरी | 28 | --"-- |

5. आम्ही खाली सहया करणारे डॉ. माने मेडिकल फौंडेशन अॅण्ड रिसर्च सेंटर, मु.पो. धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर या संस्थेचे चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये अभिप्रेत असलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून डॉ. माने मेडिकल फौंडेशन अॅण्ड रिसर्च सेंटर, मु.पो. धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर दिनांक / /200 रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या ज्ञापनावर सहया केल्या आहेत.

| अ.न | सभासदाचे नांव | पत्ता | सही. |
|---|---|---|---|
| 1. | डॉ.स्वप्नील माधवराव माने | मु.धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर | |
| 2. | डॉ. प्रशांत माधवराव माने | मु.धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर | |
| 3. | श्री.गणेश नानासाहेब बुचुडे. | मु.पो. ता.राहुरी, जि. अहमदनगर | |
| 4. | श्री.संजय रावसाहेब थोरात | मु.पो. ता.राहुरी, जि. अहमदनगर | |
| 5. | श्री.योगेश नानासाहेब बुचुडे | मु.पो. ता.राहुरी, जि. अहमदनगर | |
| 6. | श्री.माधवराव विठ्ठलराव माने | मु.धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर | |
| 7. | श्री.विजय रावसाहेब थोरात | मु.पो. ता.राहुरी, जि. अहमदनगर | V.R.Thorat |

वरील सहया करणारे यांना मी ओळखतो त्यांनी माझे समोर सहया केल्या आहेत.

**Rajendra Uttamrao Karande**
**B.A.LL.B.**

स्थळः- अहमदनगर

दिनांकः-28/6/ 2010.

अॅडव्होकेट [redacted]

-: **दाखला** :-

असे प्रमाणित करण्यात येते की, डॉ. माने मेडिकल फौंडेशन अॅण्ड रिसर्च [redacted] मु.पो. धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर नांवाची व नाम सदृष्य असलेली अन्य संस्था [redacted] आमचे माहितीनुसार अस्तित्वात नसून नोंद झालेली नाही.

12/3/12

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ.स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

[redacted]

-: परिशिष्ट "क" :-

संस्थेचे नांवः- डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर,

मु.पो. धानोरे, ता.राहुरी,जि. अहमदनगर

-: नियम व नियमावली :-

1. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्याः-

| | |
|---|---|
| संस्था | : म्हणजे , डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, मु.पो.धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर |
| अध्यक्ष | : म्हणजे डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, मु.पो.धानोरे, ता.राहुरी जि. अहमदनगर या संस्थेचे अध्यक्ष असे समजले जाईल |
| उपाध्यक्ष | : म्हणजे डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, मु.पो.धानोरे, ता.राहुरी जि. अहमदनगर या संस्थेचे उपाध्यक्ष असे समजले जाईल |
| सचिव | : म्हणजे डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, मु.पो.धानोरे, ता.राहुरी जि. अहमदनगर या संस्थेचे सचिव असे समजले जाईल |
| सहसचिव | : म्हणजे डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, मु.पो.धानोरे, ता.राहुरी जि. अहमदनगर या संस्थेचे सहसचिव असे समजले जाईल |
| खजिनदार | : म्हणजे डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, मु.पो.धानोरे, ता.राहुरी जि. अहमदनगर या संस्थेचे खजिनदार असे समजले जाईल |
| कार्यकारी मंडळाचे सभासद | : म्हणजे डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, मु.पो.धानोरे, ता.राहुरी जि. अहमदनगर या संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभासद असे समजले जाईल |

2. कार्यक्षेत्र : या संस्थेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र राहील

3. हिशोबाचे वर्ष : या संस्थेचे हिशोबाचे वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च अखेरचे राहील

4. सभासदत्व व त्यांची नोदणी पध्दतः

18 वर्षावरील कोणत्याही भारतीय स्त्री अगर पुरुषास सभासदत्व प्राप्त करता येईल. त्याकरिता त्यांना संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल. आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यानंतर सभासदत्वाची निर्धारीत वर्गणी संस्थेत जमा केल्यानंतर त्याची नोंदणी सभासद यादीमध्येकरण्यात येईल. एखादया व्यक्तीस सभासद करुन घ्यावयाचे किंवा नाही हा अधिकार संपूर्ण कार्यकारी मंडळाचा राहील. सभासदत्व नाकारतांना त्यास कोणतेही कारण देण्याचे बंधन कार्यकारी मंडळावर राहाणार नाही.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ. स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

5. सभासद प्रकार:-

| | |
|---|---|
| अ. संस्थापक सभासद : | मंडळाचे स्थापनेच्या वेळेला जे सभासद होते. सभासद त्यांना संस्थापक सभासद मजण्यात येईल |
| ब. साधारण सभासद : | वार्षिक रु.501/- देणा-या सभासदास साधारण सभास समजण्यात येईल |
| क. अजीव सभासद : | रु.1001/- भरणा-या सभासदास अजीव सभासद समजण्यात येईल |

6. सभासदत्व रद्द होणे बाबत :-

1. कोणताही सभासद फौजदारी गुन्हयाखाली शिक्षेस पात्र ठरल्यास.
2. त्याचेकडून अनैतिक वर्तन घडल्यास. सभासद वर्गणी न दिल्यास.
3. मरण पावला असल्यास. गैरवर्तणुक करीत असल्यास.
4. देश सोडून परदेशात गेला असल्यास. व्यसनी झाला असल्यास.
5. संस्थेला नुकसान पोहचवत आहे असे निदर्शनास आल्यास अथवा अन्य कारणावरुन कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव मंजूर करुन काढून टाकल्यास.
6. कार्यकारी मंडळाच्या सलग तीन सभांना गैरहजर राहील्यास.

7. सर्व साधारण सभा व तिची कार्ये आणि अधिकार:-

1. सर्वसाधारण सभा संस्थेची सर्वश्रेष्ठ व निर्णय देणारी सभा म्हणून समजण्यात येईल. या सभेस सर्व प्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील.
2. ही सभा वर्षातुन एकदा तरी घेतली पाहीजे.
3. कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे.
4. वार्षिक हिशोब मंजूर करणे. नविन वर्षाचे अंदाजपत्रकाला मंजूरी देणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ. स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुडुंडे |

8. <u>सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या</u> :-

सर्वसाधारण सभेची सुचना संस्थेच्या सर्व सभासदांना देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण, सभेचे विषय नमूद करावे, सर्व सदस्यांना संस्थेच्या डाकबुकावर सही घेऊन देता येईल, अगर टपालाद्वारे पाठविता येईल. सुचना सभेच्या 8 दिवस अगोदर पाठविणे आवश्यक राहील.

एकूण सभासद संखेच्या 1/3 सभासद उपस्थित झाल्यास सभेची गणसंख्या झाली असे समजण्यांत येईल. गणसंख्ये अभावी मुळ सभा स्थगित झाल्यास नंतर अर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल.अशा सभेला गणसंखेचे बंधन राहणार नाही. परंतु सभेच्या नोटीशी मध्ये तशी टिप असणे आवशयक आहे.

9. <u>विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये</u> :-

अध्यक्ष व कार्यकारी मंडळास जरुर वाटल्यास विशेष सर्व साधारण सभा घेतली जाईल. तसेच कमीत कमी एकूण सभासद संख्येच्या 2/3 सभासदांना लेखी सुचना केल्यास ते मागणीपत्र सादर झाले नंतर एकमहिन्याचे आंत अशी सभा अध्यक्ष, सचिव च्या मदतीने बोलावतील. या सभेची नोटीस व विषय सभासदांना 8 दिवस अगोदर दिली जाईल व अशा सभेस विषय पत्रीकेवर नसलेल्या विषयांचा विचार केला जाणार नाही.

10. <u>संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना</u> :-

संस्थेचे कार्यकारी मंडळ 13 सदस्यांचे राहील. त्यात पुढील पदाधिका-यांचा समावेश राहील.

1. अध्यक्ष - एक 2. उपाध्यक्ष - एक 3. सचिव - एक. 4. सहसचिव-एक
5. खजिनदार - एक व अन्य कार्यकारी मंडळाचे सदस्य राहतील

<u>कार्यकारी मंडळातील कार्यकाळ व निवडणुकीची पध्दत</u> :-

1. कार्यकारी मंडळाचा कार्यकाल 5 वर्षाचा राहील.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ. स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

2. कार्यकारी मंडळाची निवड दर 5 वर्षांनी वार्षीक सर्वसाधारण सभेत सर्वप्रकारच्या सभासदामधून निवड करण्यात येईल. नविन कार्यकारी मंडळाची निवड होईपर्यंत जुने कार्यकारी मंडळ कामकाज पाहील. कार्यकारी मंडळाचे सदस्य हेच विश्वस्त राहातील.
3. संस्थेची कोणत्याही प्रकारची बाकी येणे असल्यास ती व्यक्ती निवडणुकीस अपात्र ठरेल.
4. निवडणुक खुले/गुप्त मतदान पध्दतीने होईल. निवडणुक अधिका-याचा निर्णय अंतिम राहील.
5. एक वर्षभर सर्व साधारण सभासद राहिल्या नंतरच त्यास मतदानाचा अधिकार प्राप्त होईल.
6. निवडणुकीच्या तारखेची सुचना आठ दिवस अगोदर कार्यालयीन नोटीसद्वारे देण्यांत येईल.

12. <u>कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे</u>:-

अ. <u>अध्यक्ष</u> :-

1. सभेचे अध्यक्षस्थान स्विकारुन कामकाज चालविणे.
2. सभेच्या हितसंबंधाने योग्य ते आदेश देणे.
3. संस्थेच्या व शाखाच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे.
4. सर्व साधारण सभा आयोजित करणे.
5. सर्व कार्यकारणी सदस्यांशी समन्वय साधने.
6. कार्यकारणी व सभासद यांचे मदतीने संस्थेचा सर्वांगीन विकास होणेसाठी प्रयत्नशील असणे.
7. संस्थेच्या कामकाजाची पुर्ण माहिती घेणे व त्यावर लक्ष ठेवणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ.स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

8. संस्थेची सरकारी, निमसरकारी कार्यालयातील व स्थानिक संस्था मधील आवश्यक ती कामे करणे.
9. मंजूर झालेले ठराव अंमलात आणने, सस्थेच्या मालमत्तेची देखरेख करणे.

ब. उपाध्यक्ष :-

अध्यक्षाचे अनुपस्थितीत अध्यक्षांचे काम करणे, तसेच त्यांना मंडळाच्या कार्यात योग्य ते सहकार्य करणे.

क. सचिव :-

1. संस्थेच्या सभा बोलावणे, संस्थेचा पत्रव्यवहार करणे.
2. तक्रारीचे निवारण करणे. संस्थेच्या कार्यावर लक्ष ठेवणे.
3. वार्षिक खर्चाची बिले मंजूर करणे, रोज हिशोब पाहून त्यावर सहया करणे.
4. संस्थेसंबंधी आलेल्या तक्रारीची दखल घेणे.
5. संस्थेसाठी किरकोळ नियम तयार करणे.
6. संस्थेच्या दृष्टीने इतर आवश्यक असलेले कामे करणे.
7. संस्थेच्या सभांचे इतिवृत्त लिहीणे व वाचून दाखविणे.

इ. सहसचिव :-

सचिवाचे अनुपस्थितीत सचिवांचे काम करणे, तसेच त्यांना मंडळाच्या कार्यात योग्य ते सहकार्य करणे.

ई. खजिनदारः-

1. संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
2. हिशोब लिहीणे अगर लिहून घेणे, हिशोब पूर्ण झाल्यावर संस्थेच्या कार्यकारी मंडळापुढे ठेवणे.
3. हिशोबाचे पुस्तकातुन वार्षिक पत्रके तयार करणे.
4. ऑडिटरने हिशोब तपासनू काढलेल्या त्रुटींची पुर्तता करणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ.स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

ई. <u>सदस्य</u> :-

संस्थेच्या सर्वसाधाण सभेस उपस्थित राहाणे, निवडणूकीच्या वेळी मतदान करणे व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

13. <u>कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा</u> :-

कार्यकारी मंडळाची सहा महिन्यातुन एक सभा घेण्यात येईल. संस्थेच्या चार सभासदानी मागणी केल्यास अध्यक्ष किंवा सचिव यांनी कार्यकारी मंडळाची सभा मागणी केल्यापासून 15 दिवयाचे आंत बोलावण्याचे बंधन राहील. सभा बोलावतांना सुचनेत मागणीचे विषय नमुद करणे आवश्यक राहील. मागणीच्या सभेला कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राहतील. मागणी सभेत केवळ मागणी केलेल्या विषयांचा विचार करता येईल.

14. <u>कार्यकारी मंडळाचे सभेची सुचना व गणसंख्या</u> :-

कार्यकारी मंडळाचे सभेचे सुचना 7 (सात) दिवस अगोदर देणे आगोदर देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण व सभेचे विषय नमुद आसणे आवश्यक राहील. सुचना संस्थेच्या डाकबुकावर सही घेऊन अथवा टपालाद्वारे पाठविता येईल. कार्यकारी मंडळाचे 1/2 सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्यापूर्ण झाली असे समजले जाईल.

15. <u>कार्यकारी संस्थेचे निवडणुकीचे नियम</u> :-

1. संस्थेची कोणत्याही प्रकारची बाकी येणे असल्यास निवडणुकीसाठी तो सभासद अपात्र ठरले.

2. निवडणुक खुले/गुप्त मतदान पध्दतीने होईल. निवडणुक अधिका-यांची नियुक्ती पंधरा दिवस अगोदर करावी.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ. स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

3. एक वर्षभर सर्वसाधारण सभासद राहिल्यानंतरच मतदानाचा अधिकार प्राप्त होईल. निवडणुकीच्या तारखेची सुचना आठ दिवसापुर्वी कार्यालयात व नोटीसीद्वारे दयावी.
4. मतांची विभागणी सम समान झाल्यास एक जादा निर्णायक मत (कस्टींग व्होट) देण्याचा आधिकार अध्यक्ष यांना राहिल.
5. सरकारी अथवा निमसरकारी नोकरीत असलेला कोणताही सदस्य निवडणूकीस पात्र राहील

16. <u>कार्यकारी मंडळातील रिक्त पदं भरणे बाबत</u> :-

मृत्यु, राजीनामा वा अन्य कारणाने कार्यकारी मंडळातील पद/पदे रिक्त झाल्यास कार्यकारी मंडळाच्या बहुमताने रिक्त पद/पदे भरता येईल. पदाधिका-यांना राजीनामा दयावयाचा झाल्यास त्यांनी तो अध्यक्षांचे जवळ दयावा, आलेला राजीनामा कार्यकारी मंडळापुढे ठेवून बहुमताने मंजूरी घ्यावी.

17. <u>कार्यमकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य</u> :-

1. कार्यकारी मंडळाची सभा सहा महिन्यातुन एकदा तरी बोलाविली पाहिजे.
2. कार्यकारी मंडळाच्या पाच सभासदांनी लेखी मागणी केल्यास तातडीची सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी तीन दिवसाच्या आंत बोलविली पाहिजे.
3. कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभारावर नियंत्रण ठेवील.
4. सर्व साधारण सभेत मंजूर झालेले ठरावांची पुर्तता करणे.
5. संस्थेचे काम सत्ररुपाने चालावे म्हणून किरकोळ नियम तयार करील, आवश्यकते नुसार त्यात बदल करणे.
6. एखादया कार्याकरिता उपसिमीती नियुक्त करु शकेल. तिचे कडुन वेळोवेळी हिशोब तथा माहिती घेऊ शकेल. कार्य समाप्ती नंतर उपसमिती रद्द करु शकेल.
7. शाखा कार्यालयांना मान्यता देणे, ती काढून घेणे.
8. संस्थेवर असलेल्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करणे. तक्रारीचे निवारण करणे, कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ.स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

9. सेवकांची नियुक्ती करणे, त्यांना काढून टाकणे व अन्य आवश्यक ती कामे करणे.

10. बहुमताने मंजूर झालेले ठराव अंमलात आणणे.

18. <u>संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग</u> :-

सभासद फि, देणगी, वर्गणी व अनुदान इत्यादी संस्थेचे उत्पन्नाचे साधने होत. संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी निधी गोळा करणेत येईल. व तो स्थावर स्वरुपाचे मिळकतीमध्ये गुंतवता येईल.

19. <u>उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद</u> :-

संस्थेसाठी आलेला निधी व संस्थेने उभारलेला निधी ज्या उद्देशासाठी आला आहे व उभारलेला आहे त्याच उद्देशावर संपूर्ण खर्च केला जाईल.

20. <u>कर्ज किंवा ठेवी या संबंधी तरतूद</u> :-

संस्थेला आवश्यकता भासल्यास कोणत्याही व्यक्तीकडून किंवा बँकेकडून कर्ज किंवा ठेवी स्विकारता येतील. त्याकरिता मा.धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 चे कलम 36 अ (3) नुसार पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

21. <u>स्थावर मालमत्ता खरेदी - विक्री करणेबाबत तरतूद</u> :-

संस्थेला स्थावर मालमत्ता खरेदी करणे तसेच विक्री करणेचा अधिकार राहील. संस्थेला त्याकरिता कार्यकारी मंडळाची बहुमताने मंजूरी घ्यावी लागेल. मालमत्तेची विक्री करणेपुर्वी मा. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 चे कलम 36 नुसार पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ.स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

22 . <u>बँक खाते</u> :-

संस्थेजवळ असलेली शिल्लक रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मान्यता प्राप्त असलेल्या सहकारी बँकेत संस्थेच्या नावाने ठेवण्यात येईल. अध्यक्ष, व सचिव या दोन पदाधिका-याच्या संयुक्त सहीने रक्कम काढता येईल. खजिनदाराला कोणत्याही वेळी रु.1000/- पेक्षा अधिक रक्कम जवळ ठेवता येणार नाही.

23. <u>सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत</u> :-

1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 15 नुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम 15 अनुसार 6 चे नमुन्यात ठेवण्यांत येईल. 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 4 प्रमाणे व 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम 7 प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एक च्या नमून्यात मा. सहाय्यक संस्था निबंधक, अहमदनगर यांच्याकडे पाठवावी लागेल.

1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 4 अ प्रमाणे व 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम 8 प्रमाणे दरवर्षी संस्थेत नौकरीस लावलेल्या कर्मचा-यांची माहिती अनुसूची दोन च्या नमून्यात मा. सहाय्यक संस्था निबंधक, अहमदनगर यांच्याकडे पाठवावी लागेल.

24. <u>नियम व नियमावलीतील बदल करणेबाबत तरतूद</u> :-

सस्थेच्या नियम व नियमावलीतील बदल करावयाचा झाल्यास सर्व साधारण सभेत उपस्थित सभासदांच्या 2/3 बहुमताने ठराव मंजूर करुन नियमावलीतील बदल करता येईल. 1860 संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम 12 प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल व मा. सहाय्यक संस्था निबंधक, अहमदनगर यांची मंजूरी घ्यावी लागेल त्यांची मंजूरी मिळाल्या नंतरच नियमावलीत केलेले बदल अमलात आणता येतील.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ.स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

25. <u>संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करणे बाबतः-</u>

संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल करावयाचा झाल्यास अथवा दोन संस्थांचे विलीनीकरण करावयाचे झाल्यास संस्था नोंदणी अधिनियम 1860 चे कलम 12 व 12 अ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

26. <u>विसर्जनः-</u>

संस्थेचे कार्य बंद करावयाचे झाल्यास 3/5 सभासदांचे बहुमाने सर्व साधारण सभेत मंजूरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देणे-घेणे व्यवहार पूर्ण करावे लागतील. संस्थेची शिल्लक असलेली मालमत्ता, अन्य दुस-या संस्थेला दान म्हणून देता येईल. संस्था नोंदणी अधिनियम 1860 चे कलम 13 व 14 प्रमाणे विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

<u>:: दा ख ला ::</u>

असे प्रमाणित करण्यात येते की, डॉ. माने मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, मु.पो. धानोरे, ता.राहुरी, जि. अहमदनगर या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही सत्य प्रत आहे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ.स्वप्नील माधवराव माने | डॉ. प्रशांत माधवराव माने | गणेश नानासाहेब बुचुडे |

12/3/12